प्रति, दि. २०/०४/२०१७

मा. कार्यकारी अभियंता,

नगररचना विभाग,

नाशिक महानगरपालिका, नाशिक

अर्जदार :श्वेता इन्फ्रास्ट्रक्चर अँड हौसींग (इं) प्रा.लि.

तर्फे संचालक श्री. सुजॉय जयंत गुप्ता

रा. सम्राट हाउस, टागोर नगर, नाशिक पुणे रोड,

नाशिक ४२२००६.

विषय : आय.ओ.डी.(Intention Of Developement) नुसार बांधकाम नकाशे मंजुर करणेबाबत.

महोदय,

मौजे नाशिक या गावचे शिवारातील सर्व्हे नं. ८९९/१+८९९/२/१+८९९/३/१/८४ पैकी प्लॉट नं. ८४ चे एकुण क्षेत्र ७८७८.४१ चौमी या मिळकतीसंबंधाने आम्ही आपले कार्यालयाकडील बांधकाम परवानगी पत्र क्र. एलएनडी/बीपी/बी५/२५४/७१८६, दिनांक २२/१२/२०१६ अन्वये रहीवासी गृहप्रकल्पाकरीता बांधकाम नकाशे मंजुर करून घेतलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाने पारीत केलेल्या रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट **(RERA)** या कायदयाची अंमलबजावणी दि. ०१/०५/२०१७ लागु होणार आहे. या कायदयानुसार आमच्या उपरोक्त नमुद रहीवासी प्रकल्पाची नोंदणी करणे गरजेचे आहे. तसेच प्रस्तुत नोंदणी करताना मंजुर बांधकाम नकाशे हे रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट याचे वेबसाईटवर अपलोड करणे बंधनकारक आहे. त्यामुळे आम्हास वरीलप्रमाणे नमुद मिळकतीसाठी डिसीपीआर, नाशिक २०१७ चे कायदयाप्रमाणे १३,६४१.२१ चौमी एफएसआय क्षेत्र मंजुर होवू शकते. आम्हास त्या मंजुर होण-या एफएसआय क्षेत्रानुसार आय.ओ.डी.(Intention Of Developement) नुसार ब्लॉक प्लॅन प्रमाणे सुधारीत बांधकाम नकाशे मंजुर करावयाचे आहेत. या पत्रासोबत सुधारीत बांधकाम नकाशे जोडत आहोत ते नकाशे आम्हास **आय.ओ.डी.(Intention Of Developement) नुसार मंजुर करून मिळावे** ही विंनती.

कळावे,

श्वेता इन्फ्रास्ट्रक्चर अँड हौसींग (इं) प्रा.लि.

तर्फे संचालक श्री. सुजॉय जयंत गुप्ता

सोबत : १. रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट **(RERA)** अनुसार अपलोड करावयाचे संपुर्ण एफएसआय स्टेटमेंट

२. मंजुर बांधकाम नकाशे

३. मंजुर बांधकाम परवानगीची प्रत

४. ७/१२ उतारा.

नगररचना विभाग न.पा. नाशिक